# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-१४१ दिनांक - १२/०४/२०२४

## “अंमली पदार्थ बाळगणाऱ्या नायजेरियन इसमांस ताब्यात घेवुन त्याचेकडुन एकुण ५७,५०,०००/- एकूण किमतीचा अंमली पदार्थ (कोकेन,एम.डी,) जप्त करण्यात तुळींज पोलीस ठाणेस यश”

दिनांक ११/०४/२०२४ रोजी तुळींज पोलीस ठाणे नेमणुकीतील पोलीस अंमलदार-१४०६५ सगळे यांना त्यांचे गुप्त माहितीदाराकरवी माहिती मिळली कि, रुम नं. २०४ जगन्नाथ अपार्टमेंट हायटेंशन रोड प्रगतीनगर या रुममध्ये एक नायजेरियन इसमाने मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थाचा साठा केला असुन, तो राहते रुममधुन चिल्लर स्वरुपात अमली पदार्थाची विक्री करीत आहे. सदरबाबत त्यांनी लागलीच वपोनि/श्री शैलेंद्र नगरकर यांना माहीती दिली. वपोनि/नगरकर यांनी लागलीच सदरबाबत मा.सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांना मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कारवाई करणेबाबत आदेश प्राप्त करुन घेवुन तसेच सोबत पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसह मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने जावुन, रुम नं. २०४ मध्ये प्रवेश करून, रुममध्ये मिळुन आलेला नायजेरियन इसम नामे EZE FRANCIS ANA AGE- 44 YEAR रा. रुम नं. २०४ जगन्नाथ अपार्टमेंट हायटेंशन रोड प्रगतीनगर नालासोपारा पुर्व ता. वसई जि.पालघर मुळ रा. स्टेट इनुगु नायजेरिया याची अंगझडती तसेच घरझडती घेतली असता खालील वर्णनाचा अंमली पदार्थ मिळुन आला आहे.

१) १३,३०,०००/- रूपये किमतीची सफेद रंगाचे ०४ गोळे असलेला कोकेन नावाचा अंमली पदाथाचे एकत्रित नेट वजन १३३ ग्रॅम प्रति ग्रॅम १०,०००/- रूपये ग्रॅम आरोपीत याचे अंगझडतीत मिळुन आलेले. )

२) १६,९०,०००/- रूपये किमतीची पारदर्शक प्लॅस्टिक पिशवी मधील तपकिरी रंगाचे पावडर एम.डी.नावाचा अमली पदार्थ त्याचे पिशवी सह वजन १६९ ग्रॅम (किमंत १०,०००/- रुपये प्रती ग्रॅम ) आरोपीत याचे घरझढीतमध्ये मिळुन आलेली.

३) २७,३०,०००/- रूपये किमतीची पारदर्शक प्लॅस्टिक पिशवी मधील फिक्क्ट सफेद रंगाचे पावडर एम.डी.नावाचा अमली पदार्थ त्याचे पिशवी सह वजन २७३ ग्रॅम (किमंत १०,०००/- रुपये प्रती ग्रॅम ) आरोपीत याचे घरझढतीमध्ये मिळुन आलेली.

अश्या प्रकारे सदर इसमाचे अंगझडतीमध्ये व घरझडतीमध्ये १३३ ग्रॅम वजनाचा कोकेन अंमली पदार्थ तसेच ४४२ ग्रॅम वजनाचा तपकिरी व सफेद फिक्कट रंगाची पावडर एम.डी. मेफेड्रॉन नावाचा अंमली पदार्थ असा एकुण ५७,५०,०००/- रूपये किंमतीचा एकुण ५७५ ग्रॅम वजनाचा बेकायदेशीर कोकेन व एम.डी. मेफेड्रॉन नावाचा अंमली पदार्थ जप्त केला असुन, सदर इसमाविरुद्ध तुळींज पोलीस ठाणे गु.रजी.नं. २९६/२०२४ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ क, २१ क, प्रमाणे दिनांक ११.०४.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन, आरोपीत यास सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक- वाय. एस. खैरे करित आहेत.

सदरची कामगीरी श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ वसई, श्री. उमेश माने-पाटील सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुधिर चव्हाण, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/सुनिल पवार,पोउनिरी/बाळासाहेब बांदल, पो.हवा/मोरे, वरठा, गायकवाड, पन्हाळकर, केंद्रे, राठोड, पोशि/साळुंखे, पोटे, कदम, सगळे, राजगे, मपोहवा- जाधव यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.